# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## POST MID-TERM EXAMINATION 2024-25

MARATHI

Class :IX | Duration : **1** Hrs
Date :10.01.2025 | Max. Marks : **25**
Admission No.: | Roll No.:

---

खंड – क वाचन कौशल्य

**खालील गदयांश काळजीपूर्वक वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–**

**प्र 1 अपठीत गदयांश :–**

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'उक्तीप्रमाणे या जगातील समाजातील सर्वच लोकांचा उद्धार व्हावयाचा असेल तर संतांना, समाज सुधारकांना जन्म घ्यावा लागतो. त्यांना आपले आयुष्य जगाच्या कल्याणासाठी खर्च करावे लागते. महात्मा फुले हे त्यातलेच एक थोर विचारवंत आणि समाज सुधारक होते. वाहत्या प्रवाहा बरोबरच लाकूड,ओंडके,पालापाचोळा आणि मृत जनावरे वाहत असतात. पण प्रवाहाच्या विरूध्द दिशेने मासे पोहत असतात. याच सिध्दांतावर आधारित फुल्यांचे जीवन होते. तत्कालीन परिस्थिती अनुकूल नसतानाही नव्या कल्पना समाजासमोर मांडल्या आणि त्या समाजाला स्वीकारायला भाग पाडले .

अठराव्या शतकाच्या पूर्वाधात म्हणजे 1827 साली पुण्यात जन्मलेल्या फुल्यांनी जातिव्यवस्था व वर्णव्यवस्थेवर कडकडून हल्ला केला. जोपर्यंत समाजातील जातिव्यवस्था आणि वर्णव्यवस्थाचा बिमोड होत नाही तोपर्यंत समताधिष्ठित समाजव्यवस्थेची निर्मिती होणे अशक्य आहे असा विचार त्यांनी परखडपणे मांडला अशी भूमिका मांडणारे ते पहिले भारतीय होते. त्याच्या कार्य प्रेरणेतून सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ठरल्या.

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा (कोणतेही तीन)** **(5X1=5)**

1 प्रवाहाच्या विरूध्द दिशेने पोहत असतात .

अ पालापाचोळा ब मासे
क ओंडके ड लामूड

2 मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा कोणी काढली ?

अ सावित्रीबाई फुले ब लोकमान्य टिळक
क न्या.रानडे ड महात्मा फुले

3 भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका कोण होत्या?

अ लक्ष्मीबाई टिळक ब पंडिता रमाबाई
क सावित्रीबाई फुले ड आनंदीबाई जोशी

4 त्या काळी समाजात स्त्रियांना कसे स्थान होते?

अ दुय्यम ब मानावे
क अभिमानाचे ड चांगले

5 उता–याला योग्य शीर्षक दया:–

## खंड – ख व्याकरण

प्र 2 खालील वाक्यांचे प्रकार ओळखा – **(3)**

1 राधा वाईट मुलगी नाही. ( होकारार्थी करा)

2 शाळेची घंटा किती वाजता होते ?

3 मुलांनों दररोज खेळ खेळा.

**प्र 3 पुढील शब्दांचे समास ओळखा –** (2)

1देवदानव

2 सप्तऋषी

**प्र 4 काळ ओळखा –** **(2)**

1 कोणताही नवा शोध एकाकी लागत नाही.

2 आशिया खंडात असंख्य बांबूच्या जातीची लागवड केली होती.

**प्र 5 लिंग बदलून लिहा –** (2)

1 उंट

2 मोर

## खंड – ग साहित्य

**प्र 6 प्रश्नोत्तरेः– अभिव्यक्ती ( स्वगत ) कोणतेही दोन** (2 x3=6)

1 ॲनी सुलिव्हॅन नसत्या तर हेलन घडली नसती या विधानाची सत्यता पटवून दयाः–

2 शब्दकोडे सोडविल्याने भाषिक कौशल्य वाढते या विषयी तुमचे मत लिहा–

3 विदयार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे हे विधान माझे शिक्षक व संस्कार या पाठाद्वारे स्पष्ट करा ?

## खंड – घ लेखन

**प्र 7 कथा लेखन –** **(5)**

एक गरीब मुलगा ––– शाळेची फी भरण्यास पैसे नसणे–––सकाळी पेपर टाकण्याचे काम करणे––––वाटेत पैशाचे पाकीट मिळणे–––प्रामाणिकपणे पोलीस स्टेशनवर नेऊन देणे––––पाकीटाच्या मालकास आनंद–––––बक्षीस––– तात्पर्य

–––––––– समाप्त ––––––––